४) चौथी कडगंची प्रत, श्री कृष्णाजी विनायक क्षीरे रेकॉर्डकीपर, डिस्ट्रिक्ट व सेशन्सकोर्ट धुळे. लेखनशक १८३१,

५) पाचवी कडगंची प्रत, श्री यशवंत रघुनाथ उर्फ बाबासाहेब पुरंदरे (पुणतांबेकर) वैद्य व पेन्शनर इन्कमटॅक्स ऑफिस. राघवाश्रम, माधवबाग मुंबई यांची प्रत. पुष्पिका अशी– ॥ शके १७६९ माघ शुद्ध गुरौ इदं पुस्तकं हिमाकर भट्टसूत बाळंभट्ट पुजारी श्रीक्षेत्रगाणगापूर ॥

६) गाणगापूर वाडी प्रत. श्री. नाथ सेवेकरी यांच्या सहाय्याने ही प्रत मिळविली.

७) औदुंबर प्रत– नरसोबावाडी येथे उपलब्ध जुनी हस्तलिखित प्रत.

८) कुरवपूर प्रत. शक १७२३. पोथीच्या अखेरच्या म्हणजे ११ व्या अध्यायाच्या शेवटी पुढील मजकूर आहे–

इति श्रीगुरुचरित्र परमकथाकल्पतरु सिद्धनामधारक संवादे श्रीगुरुमूर्ति अदृश्यंनाम एक पंचादशोध्याय ॥५१॥ ग्रन्थसंख्या ॥७१७५॥ श्रीपाद श्रीवल्लभार्पणमस्तु ॥ श्रीरास ॥ श्रीकृष्ण ॥ शके १७२३ वर्षे दुर्मतिनाम संवत्सरे दक्षिणायने शर्द्द तौ कार्तिकमासे कृष्णपक्षे चतुर्थ्यातिथौ भौम्यवासरे पुनर्वसुनक्षत्रे प्रथमप्रहराष्ट्र घटि कर्दळीग्रामे समाप्तं ॥ इदं पुस्तकं मेघाशामसूत यहादेवेन लिखित स्वार्थपरमार्थ च ॥ श्री ॥

९) केंगेरी प्रत– शके १६९१. ही प्रत प. पू. श्रीमत्पांडुरंग महाराज दीक्षित (महान अवतारी श्रीचिदंबरप्रभू यांचे पणतू व त्या प्रभूचाच दुसरा अवतार म्हणून प्रसिद्ध असलेले) रहाणार मुरगोड नजिक केंगेरी.

१०) श्रीपंतमहाराज बाळेकुंडीकर यांच्या घरची प्रत. लेखन शके १७२२.

११) कुंदगोळ प्रत. शके १७८५

१२) आंबेवाडी प्रत. शके १७१७ रा. कल्याण श्रीराम आंबेवाडी राहणार झुळजे (बेळगाव नजिक)

१३) परोळकर प्रत. शके १७३६.

१४) विंझणेकर प्रत. रा. गोविंदराव रामचंद्र विंझणेकर इनानदार मु. विंझणे (जि. बेळगाव) यांच्या घरची प्रत. लेखनशक दिलेला नाहींए ! पण कागद व अक्षर पहाता ती शे–सव्वाशे वर्षांपूर्वीची असावी असे वाटते.

१५) खांडोळे प्रत. शके १७७४. वे. शा सं. सखाराम व वसंत नारायण भट्ट सुखटणकर माशेल नजिक खांडोळे (श्री गणपति देवस्थान) येथे मिळाली.

१६) पेडणे प्रत. शके १७८०, वे. शा. सं. रामचंद्र जनार्दन भट्ट मिरवणकर (पं. अनंतशास्त्रीच्या धुपकर यांचे यामा) रा. पेडणे

१७) चिकोडी प्रत. शक १६९६ वे. शा. सं. अप्पाशास्त्री कल्लोळकर यांनी श्रीविठ्ठल मंदिरात असलेली प्रत दाखविली. प्रतींची पुष्पिका पुढीलप्रमाणे आढळते.

शके १६९६ जयनाम संवत्सरे वैशाख कृ. १४ सौम्यवासरे प्रातःकाळे प्रथम प्रहरे तद्दिनी समाप्त श्रीसिद्धाश्रमसन्निध श्रीलक्ष्मीनारायणर्पणमस्तु ॥ ग्रंथसंख्या ७१९५ हस्ताक्षर सांतो साबाजी ॥

१८) दड्डीप्रत. शके १७८२. श्री. पांडुरंग ज्ञानदेव शास्त्री (कामत) एकसंबेकर मु. संकेश्वर पुष्पिका अशी–

इति श्रीगुरुचरित्र कथाकल्पतरु सिद्धनामधारक संवादे श्रीगुरुनिजधामगमनो नाम एकपंचाशत्तमोध्याय: ॥ ५१ ॥ गतवोवी (म्हणजे मागील अध्यायापर्यन्तची ओवीसंख्या) ७०५०. प्रसंग वोवी म्हणजे या ५१ व्या अध्यायाची ओवीसंख्या) ७६ यकुन वोवी (एकूण ओवी) ७१२६ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ।। अथ लिखित समाप्त शक संवत्सरादि लिख्यते ॥ स्वस्ति श्रीमंनृपशालिवाहन शके १७८२ रौद्रनाम संवत्सरे दक्षिणायने शरदृतौ आश्विनमासे शुक्लपक्षे विजयदशम्यां भौमवासरे. अस्मिन शुभदिने धोंडो आत्मज नारायण वाडेकरोपनामकेन लिखित समाप्तकृतं ॥ यादृशी पुस्तकं दृष्टवा ... ॥१॥ ... इदं पुस्तकं अंताजी धोंडो नायीक वाडेकर वास्तव्य दड्डी याचे आहे. ॥ ... याजवरील चित्र अनुसंधानाप्रमाणे रामचंद्र येशवंत नाईक कडलगेकर याणे काढली आहेत. हे सर्व श्रीसद्गुरुनाथ चरणारविंदार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥ श्रीसद्गुरु विजयते ॥ या पोथीचे कागद व अक्षर फारच चांगले आहे.

१९) श्रीटेंबेस्वामी प्रत. ही स्वामीमहाराजांच्या आजोबांची प्रत म्हणतात. ही माणगावास स्वामीमहाराजांच्या देवालयात पहाण्यास मिळाली पुष्पिका अशी–

इति श्रीगुरुचरित्र परमकथा कल्पतरू सित्थनामधारक संवादे श्रीगुरुनिजानंदगतो नामैकचपांशदध्याय: समाप्त: ॥ अध्याय ५१ ॥ ग्रंथसंख्या ७२७० ॥ श्रीदत्तात्रेय श्रीपाद वल्लभ श्रीनृसिंह देवतार्पणमस्तु ॥ शके १७८२ रौद्रनामसंवत्सरे श्रावण कृष्ण सप्तम्यां सौम्यवासरे इदं पुस्तकं टेंक्योपाह्य लक्ष्मणात्मज हरिभट्टेन लिखितं समाप्तं ॥

२०) साधले शास्त्री प्रत. माणगावचे श्री. वे. शा. सं. गजानन शंभु शास्त्री साधले (उपनिषद्वावचमहाकोशकर्ते) यांची प्रत. पोथीतली पुष्पिका पुढीलप्रमाणे आढळते–

इति श्रीगुरुचरित्रे नरसिंह सरस्वत्योप्याखाने बिधूनामधारक संवादे श्रींगुरुदर्शनं नाम एकपंचाशत्तमोध्याय: ॥ ५१ ॥ (ओवीसंख्या ९६) एवं गुरुचरित्र ग्रंथसंख्या ७१९५, शके १७८८ क्षयनाम संवत्सर पौषशुद्ध एकादश्यां सौभ्यवासरे इदं पुस्तकं समाप्तं. भाटवडेकरोपनाम्ना भिकंभट्टेन लिखितं श्रीपादश्रीवल्लभश्रीनरसिंहसरस्वतीदेवतार्पणमस्तु ॥ श्रीआदिगुरवे नमोस्तु दासस्य ॥

२१) श्री गाणगापुरची प्रत. इंदूरच्या 'गुरूसेवापरायणी' महाराणी श्रीमंत सौं. इंदिराबाईसाहेब होळकर यांनी माणगावास आपल्या गुरुदेवांच्या जन्मस्थानी बांधलेल्या देवालयात गाणगापूरची प्रत आणवून ठेवली आहे. पुष्पिका अशी– सरस्वती गंगाधरु, श्रोतया करी नमस्कारु,.........

इति श्रीमन्महागुरूचरित्र कथायां श्रीसिद्धनामधारकसंवादे कथाकल्पतरु–

योगोन्नाम येकाव्होन्नोध्याय: ।। ५१ ।। श्रीगुरुनाथार्पणमस्तु ।।...... श्रीविष्णुर्विष्णु श्रीमभ्द्गवते महापुरूषस्य विष्णुराज्ञया प्रवर्तमाने शोभकृत्‌नाम संवत्सरे दक्षिणायने सरद्रतौ आश्विनमासे शुक्लपक्षे आधा इंदौ दशमिय अद्यवासरे इंदुवासरे उतराशाढ-नक्षत्रे प्रथमप्रहरे एवंगुणविशेषण विशिष्टायां षुभतिथौ अस्माकं लेखकपाठक सहकुटुं-बानां क्षेमस्थैर्यं आयुरारोग्य अैश्वर्याभिवृद्धयर्थे पठेत्‌ शके १७६५ सन १२५३ फसली. हे पुस्तक अनंत लिगो कमष्टाण हस्ताक्षर अनंत । .... ।।"

२२) असनोडे प्रत. सपादक कामतांचे मातुल (मातुःश्री चे चुलत बधू) वै. विष्णु अनंत कामत बांदिवडेकर रा. असनोडे प्रांत गोमांतक यांची हस्तलिखित प्रत.

२३) बैलहोंगल प्रत. श्री. गुरूनाथ बाळाजी बेकनाळकर रा. बैलहोंगल यांनी दिली. पुष्पिका अशी —

इति श्रीगुरूचरित्र कथाकल्पतरू सिद्धनामधारक संवादे गुरुचरित्रकथन श्रीस्वामी गिरियात्राभिगमन । निजानंद योगोन्नामे क. ।। ५१ ।।...... एकूण ग्रंथ-संख्या ७१२३ आणि ४७ वे अध्यायातील अष्टक ८ श्लोक व बेचाळीस प्रसंगातील श्लोक ३६ एकूण ४४ वट ७१६७ सातहजार एकशे सदसष्टी ।। श्रीगुरूनाथार्पणमस्तु ।।...... शके १७८२ रौद्रिनामसंवत्सरे ।। लेखक काळदेवात्मज भगवंतसूत बाळकृष्णेन-लिखिता ।। उपनाम बेकनाळकर मो. ।। अत्रिगोत्रोत्पन्न: मु. होंगल ।। ता. संपगाव ।। जि. बेळगाव.

२४) रामनामे प्रत. चिंतामण अप्पाराव रामनामे ऊर्फ राघवदास 'उभयभाषाकीर्तन विशारद' इन्स्पेक्टर दि. बेळगाव डिस्ट्रक्ट सेट्रल को-ऑपरेटिव्ह बँक यांची प्रत शके १७८२.

श्रीवासुदेवानंद सरस्वती (इ. स. १८५४ ते १९१४)

श्री वासुदेवानंदांचे संपूर्ण नाव श्रीवासुदेव गणेश टेंबे असून त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयातील माणगावी झाला. त्यांच्या आईचे नांव रमाबाई. वासुदेवानंद कऱ्हाडे ज्ञातीय ब्राह्मण असून त्यांचे घराणे दत्तोपासक होते.

वासुदेवानंदाचे प्राथमिक संस्कृत शिक्षण त्यांचे पितामह हरिभट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली झाले व पुढील अध्ययनासाठी त्यांनी वेगवेगळ्या पाठशाळांचा आश्रय घेतला. वेदोपनिषदे, पंच महाकाव्ये आणि ज्योतिषशास्त्र यांचा अभ्यास त्यांनी बालवयातच पूर्ण केला. वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई या अत्यंत सुशील व पतिसेवापरायण होत्या. त्यांना झालेला एकुलता एक मुलगा अल्पवयातच वारला.

दत्तमूर्तींची ठिकठिकाणी प्रतिष्ठापना, दत्तोपासनेचा प्रचार व धर्मजागृती-साठी पुराण पठण प्रवचने, तीर्थयात्रा त्यांनी केल्या. उज्जयिनी, ब्रह्मावर्त, बदरी-केदार, गंगोत्री, हरिद्वार, द्वारका, तंजावर, कुरगड्डी, गरुडेश्वर आदि ठिकाणी त्यांनी चातुर्मास केले. शेवटी गरुडेश्वर येथेच ज्येष्ठ वद्य ३० शके १८३६, या दिवशी ते निर्वाणपदाला पोचले त्यांच्या निर्वाणस्थळी त्यांचे समाधिमंदिर उभारलेले असून श्रीदत्तपादुकांचीही स्थापना केलेली आहे. प्रतिवर्षी तिथें त्यांचा पुण्यतिथि महोत्सव संपन्न होतो. भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते.

श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचे शिष्योत्तम श्रीमत् प. पू. योगानंद सरस्वती उपाख्य गांडा महाराज यांनी महाराजांवर 'श्रीगुरुमूर्तिचरित्र' नावाने मोठा काव्यग्रंथ लिहिला आहे. योगानंद सरस्वतींचा जन्म शके १७९० मार्गशीर्ष पौर्णिमा श्रीक्षेत्र तलंगपूर जिल्हा सुरत येथे झाला. त्यांनी शके १८५० फाल्गुन वद्य १२ रोजी श्रीक्षेत्र गुंज जिल्हा परभणी येंथे समाधि घेतलीं. या काव्यग्रंथात महाराजांच्या जीवनाचा संक्षिप्त परिचय येतो. खरा परिचय आढळतो तो महाराजांच्या कार्याचा व सदुप-देशाचा ! ! या ग्रंथात महाराजांच्या उपदेशपरक वचनांना काव्यात्म शैलीत गांडा महाराजांनी प्रतिपादित केले आहे. साधारणपणे एकशे आठ ते एकशे पंधरा ओव्यांचे शंभरावर अध्याय या ग्रंथात आढळतात. ज्या एकावन्न श्लोकांच्या संस्कृत गुरु-चरित्राचा विचार आपण करणार आहोत, त्याबद्दल फक्त अर्ध्या ओवीत समाचार घेतला आहे. परंपरेने भक्त मंडळीच्या दृष्टीने उपयुक्त व श्रद्धाळूंना चमत्कृत करतील अशा घटना प्रसंगांनी ग्रंथ भरलेला आहे. यात काही मनोरम संस्कृत स्तोत्रे व सूक्ते ही आढळतात. यातली काही सुभाषिते तर अप्रतिमच आहेत. या पोथीत आलेले नर्मदा स्तोत्र या दृष्टीने अभ्यसनीय आहे. आपल्या सद्‌गुरुनाथाबद्दलच्या अलौकिक श्रद्धामय दृष्टीकोनातून लिहिलेला हा काव्यग्रंथ दत्त सांप्रदायिकांमध्ये पारायणाच्या दृष्टीने ही उपयुक्त ठरल्यास नवल नसावे. ग्रंथाची शैली सुगम, बोध-गम्य व प्रासादिक अशी असल्यामुळे ग्रंथ वाचतांना मनाला एक आगळाच संतोष व आल्हाद वाटतो.

श्री वासुदेवानंद सरस्वतींची मराठी, संस्कृत ग्रंथ संपदा विपुल आहे. त्यांची भाषा ललितमधुर, प्रासादिक व अंत:करणाचा ठाव घेणारी आहे. त्यांचे काही मराठी ग्रन्थ पुढीलप्रमाणे आहेत—

१ दत्तमहात्म्य– यात सामान्य लोकांसाठी दत्तात्रेयाचे चरित्र आहे.
२ सप्तशती गुरुचरित्र– मराठी ओवीबद्ध.
३ श्रीदत्तलीलामृताब्धिसार– दत्तमहात्म्य ग्रन्थाचा सुलभ संक्षेप.
४ माघमहात्म्य- माघ मासाचे महात्म्य सांगणारा ग्रन्थ,

महाराजांचे संस्कृत ग्रंथ-

१ गुरुसंहिता- हे मराठी ओवीबद्ध गुरुचरित्राचे संस्कृत रुपांतर आहे.
२ दत्तपुराण- यात दत्तात्रेयविषयक सर्व पौराणिक सामग्री.
३ शिक्षात्रय- जीवनाच्या कुमार, युवा, वृद्ध अशा तीन अवस्थांचे नियमन करण्यासाठी रचलेला ग्रन्थ.
४ स्त्रीशिक्षा- स्त्रियांच्या कर्तव्याविषयी विवेचन करणारा ग्रन्थ.
५ कृष्णालहरी- बावन्न श्लोकी कृष्णा नदी स्तोत्र.
६ अनसूयास्तोत्रम्- सहा श्लोकांचे स्तोत्र.
७ अघोरकष्टोद्धरणस्तोत्रम्- पाच श्लोकांचे स्तोत्र.
८ जयलाभयशःप्राप्तिस्तोत्रम्- नऊ श्लोकांचे स्तोत्र.
९ चित्तस्थैर्यकरंस्तोत्रम्- सहा श्लोकांचे स्तोत्र.
१० शांतिस्तोत्रम- नऊ श्लोकांचे स्तोत्र.
११ वेद पादस्तुति सटीक.
१२ पदसमूह (आवृति दुसरी)
१३ एकपंचाशतश्लोकी गुरुचरित्र-

या व्यतिरिक्त काही कीर्तनोपयोगी आख्याने, पदे. आरत्या, स्तोत्रे शेकडोंनी मराठी व संस्कृत भाषेत आहेत. चार पाच हजार पृष्ठांचा हा ग्रन्थसंभार वासुदेवानंदांच्या दत्तभक्तीचे, धर्मनिष्ठेचे, प्रगाढ चिंतनशीलतेचें आणि लोकोद्धाराच्या तळमळीचे प्रत्यंतर घडविणारा आहे

एकपंचाशतश्लोकी गुरूचरित्र

श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या ग्रंथांची चर्चा अनेक ठिकाणी आढळते. पण मला उपलब्ध झालेला संस्कृत गुरुचरित्राचा ग्रंथ मात्र अनेक दृष्टींनी वैशिष्ठ्यपूर्ण आहे. एकतर याचा उल्लेख महाराजांच्या ग्रन्थ संपदेत कुठे आढळत नाही. दुसरे म्हणजे एकावन्न श्लोकांमध्ये भाविकांसाठी रचलेल्या या संस्कृत ग्रन्थांची रचना नितांत वैशिष्टयपूर्ण अशी आहे. यातला प्रत्येक श्लोक हा स्वतंत्र गण-मात्रा वृत्त अलंकाराने युक्त असून श्लोकांची रचना आकाराने लहान मोठी आहे. माझे सन्मित्र आदरणीय प्रा. पी. जी. कुळकर्णी यांच्या घरी देवपूजेच्या पोथ्यामध्ये असलेल्या या ग्रन्थाची छापील प्रत मजजवळ अध्ययनार्थ आहे. सावंतवाडी येथे श्रीगुरुदत्तात्रेय छापखान्यात छापून श्री रामचंद्र शंकर भट्ट सप्ते यांनी प्रस्तुत ग्रन्थ विरोधनाम

संवत्सरे शके १८३३ साली प्रकाशित केल्याचा उल्लेख ग्रन्थात आढळतो.

इ. भ. प. रा. कृ. यांनी संपादित केलेल्या श्री गुरुचरित्राच्या अवतरणिका अध्याय क्रमांक बावन्नावा यात पृष्ठसंख्या ६६५ ते ६७० पर्यन्त १९ ते ७५ क्रमांकाच्या ओव्यात संपूर्ण ग्रंथाचे सार संकलन आलेले आहे. त्या एकूण ५६ ओव्या आहेत. पण संस्कृत गुरुचरित्राशी त्या ताडून बघता संस्कृत श्लोकांचे आगळे वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. पोथीत अलंकाराचे नांव ठळक अक्षरात छापलेले आहे. फक्त श्लोक क्रमांक ४४ व ४८ यात अलंकाराचे नाव आढळत नाही. ग्रन्थाची भाषा मूळातच संस्कृत- त्यातही संधींनी युक्त असल्यामुळे क्वचित उच्चारण्यास ही अवघड अशी आहे.

प्रस्तुत पोथीच्या हस्तलिखित प्रतींचा शोध घेऊ जाता भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये वासुदेवानंतर सरस्वतींच्या ग्रन्थापैंकी एकाही ग्रन्थाची हस्तलिखीत प्रत नसल्याचे आढळते. डेक्कन कॉलेजच्या पदव्युत्तर आणि संशोधन विभागाच्या ग्रन्थालयात प्रस्तुत ग्रन्थाच्या हस्तलिखित प्रतींचा शोध घेतला असता ती तिथे ही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.

एकपंचाशतश्लोकी गुरुचरित्र

॥ श्री गणेशाय नमः ॥

श्रीगुरुसंहिता-समश्लोकी गुरुचरिता-ध्यायसारांश एकपंचाशत श्लोकी
गुरुचरित्रप्रारंभः ॥
अध्याये प्रथमइष्टवंदनाख्यं प्रोक्रमं गलमथनामधारकाख्याम् ॥
प्राप्येष्टं स्तुतइहधामहर्षणीयं दत्तोदर्शयदुतनु ***प्रहर्षिणीयम्*** ॥१॥
सिद्धः सृष्टि युगस्थितीरिहजगौ सर्गेद्दितीयेविधेः
संवादंकलिनाचदीपक गुरूपाध्यानकं सद्दिधेः ॥
यच्याकारिहि दीपकेनगुरूस त्सेवाख्यविक्रीडितं
कुर्यात्कोऽत्रतथाकरोन्यपिराशः ***शार्दुलविक्रीडितम्*** ॥२॥
तृतीयेऽध्यायेऽ भोनशनमिनिमौनैः प्रथमतोऽ
वरीषोपाद्दिष्णु व्रतहतिभियावैष्णवमतः ॥
व्रजानेकायोंनी रितिशपतिदुर्वाससिहरि
स्तमादाच्छापंप द्दिजसहनताभू ***टिछरवरणी*** ॥३॥

तुर्येत्रीशाः सत्यहृत्यैयथाऽन्नं
श्मेहृंतेऽदा ध्यानसूयातथाऽन्नम्
बालाभूत्व दुग्धमस्याःपपुस्ते
यत्कीर्तिदिक् ***शालिनी*** सर्वदाऽऽस्ते ॥४॥
दत्तायददौ द्विजांगनाऽन्नं श्राद्धात्पुरतः सपंचमेभत ॥
श्रीपादभिवः सुतोंऽग्रपंगूद्धृभ्द **द्रविरा** ड भूत्परिव्राट् ॥५॥
शिवोदशाख्या यददौस्वार्लिंग प्रगृह्यदंभा द्वणपस्ततस्तम् ॥
उपेंद्रवज्रा स्रमुखेरितः कौ महावलेशं निदधौसषठे ॥६॥
भूपेंद्रवंशो न्नतयेऽत्रसप्तमे गोकर्णमाहा त्म्यमुवाचगौतमः ॥
तव्द्रह्महत्या लय कृद्वर्तिवद न्यंडालिकायाः प्रशसंभूभृते ॥७॥
सकुसुतविधवाप्ता भर्तुकामाप्रदोष
व्रतकथनतईश स्ताव्निवर्त्याष्ट मेंडतात्
सविबुधमकरोत ज्जजन्यांतरेऽस्याः
सुतइह भत्रितादिड् ***मालिनी*** यस्यकीर्तिः ॥८॥
आख्यानकीर्ति श्रृतितोऽस्यमुक्ति र्भवांतरेऽसौ रजकायराज्यम् ॥
दास्यान्तिरोभू न्नवमेऽत्रकृष्णा तटेऽपिसंपूरयतिस्त्रतृष्णाम् ॥९॥
पथितस्करद्यानितभक्तं सार्थमजीवयदेत्यचिरस्य ॥
विनिहत्यचतान्दशमेश्री पादति ***वेगवती*** गतिरस्य ॥१०॥
एकादशेनृहरि संज्ञकआससोंडवा
पुत्रः प्रदोषफलदः प्रणवंपठिष्यन् ॥
भूत्वाऽप्यवावत्र्श्रृतिगणा नुपनीतऊच
उद्धर्षिणीं स्वजननीं बहुधाकरिष्यन् ॥११॥
माणवका क्रीडतिक्व द्वादशआश्वास्यविभुः ॥
मातरमे त्यचकाशीं न्यास्यभव त्सनिराशीः ॥१२॥
प्रसूमुखै र्जनिभुविसंगतः स्वर्कस्त्रयोदशे नृगयुगुपेनृन्यगौतमीम् ॥
मृतोत्सुकं जठररुगार्तमुद्धर न्त्यदर्शय भ्दुवि ***रुचिरां*** प्रभुर्गतिम् ॥१३॥
सायंदेव शक्रमिताध्यायउवाचत्रीशोम्लेच्छं याहिन भोस्ते सतथेति ॥
गत्वाभीत म्लेच्छनृपेणार्चितएत्य नृत्यभ्रा जे ***मत्तमयुरो*** हियधासः ॥१४॥
चित्रपदोक्ति तईश स्तीर्थगमायास्तशिष्यात् ॥
पंचदशेकथयित्वा तद्विधिभीरथदेव ॥१५॥
षोडशे गुरु ***रथोद्धता*** त्यन धौम्यशिष्य चरितोपदेशतः ॥
ब्राह्मणाय विदमर्पयद्गुरु द्रोहिणेऽलमनुतप्तचेतसे ॥१६॥
आर्या वमानितोडरा दार्यार्यैमूढविप्रइहजिव्हाम् ॥

सप्तदशेतत्प्रेरित ईशमवाप्याल भत्ततोजिव्हाम् ॥१७॥
भिक्षार्थंगत्वा *कुसुमितलता वेल्लित* द्वारदेशं
गेहंविप्रस्यप्रभुरतिदरि द्रस्यभुक्त्काडपिशाकम् ॥
छित्वावल्लीं स्ववसतिमगा त्तल्लतामूलेदेशे
लेभेडर्थौ द्यं द्विजवर इहाष्टादशेचाशिषोडपि ॥१८॥
अमम पुरऊर्नविशकेऽ नुगगंगा नुजपाउदुंबरे ॥
वरदे सनिधायपादुके गुरुराश्वा स्यच *योगिनी* रगात् ॥१९॥
प्रेतार्तिहृताऽभौं दत्तौमृतएक: ॥
वर्ण्यापि तदंबा विंशें *तनुमध्यम्* ॥२०॥
विद्युन्माला वत्संबंधं पुत्रादे:स न्योत्काबोधम् ॥
सर्त्यचक्रे जीवोपेतं सैकेविंशेऽ सौतत्पोतम् ॥२१॥
गंधर्व प्राप्यभीमा मरदुहितृयुतिं भिक्षार्थमथगुरु
र्गत्वादीनर्द्विजौको गतरदमहिषीं वंध्यांभरबहां
दृष्वादुग्धंययाचे तदनु *सुवदना* स्त्री:क्षीरमदुह
द्याविंशेऽदात्पयोस्मै: तदुवरदगुरु: पीत्वागमदसौ ॥२२॥
राष्ट्रत्रयोविंशआ कर्ण्यसत्तद्यश:
स्रग्विणीं स्वांपुरी मानयत्तद्दश: ॥
श्रीगुरुरक्षसेऽ दाद्गतिराजव
द्राजदत्तेमठे विश्ववासोऽवसत् ॥२३॥
निंदांकर्तृयतित्रिविक्रमं प्राप्यश्रीगुरुराश्वदर्शयत् ॥
सैन्यंन्यासिवपु: क्षणंचतु विंशेयानगराजन *व्दिराट्* ॥२४॥
मत्ता वाप्तौ श्रृतिनयविज्ञौ म्लेच्छाज्ञप्तौ बिजविजिगीषू ॥
भिक्षूमिन्ये श्रितशिबिकौतौ गुर्वेर-यंपं चसहितविंशे ॥२५॥
*चित्रपदो*क्तिभिरीश: षड्युतविंशउवाच ॥
वेदतदंगविशाखा यंप्रणमंत्रि हिलेखा: ॥२६॥
अपिकइहथदी क्षणाद *पराजिता:*
सबुखडवदन्त च्छुती: समवाचयत् ॥
अनयद्दुभमिते द्विजौचपिशाचतां
सुगतिमथगतौ चतौद्विषडब्दत: ॥२७॥
अकभयदसा वष्टाविंशे स्वकर्मबिपाकतो
विविधकुगर्नि हीनत्वाप्ति सचिन्हपुनर्भवं ॥
तदघहतये प्रायश्चितं चक्रुच्छृजपादिकं
पतितमकरो भ्दयोऽज्ञंसा मनो*हारिणी* कथा ॥२८॥

नवद्वपयुतेनते नमुनिनासपृष्टोऽवद
द्विभूतिमहिमानमानत पदास्त्र पाग्रावदत: ॥
कुमारहृरवादन प्यथसवामदेवोददो
गतिभसितधारणे नविधिवच्च *पृश्वीवर*: ॥२९॥
गोपीनाथोऽ त्रिसुतभजना त्पुत्रमाप्रोदूहांश्चं
तत्स्त्रीरुग्णं तमनपदथोप्तनंगाणगाख्यं ॥
मंदाक्रांता ध्वनिसनुपुर स्योपकंठमार
त्रिंशेतत्स्मी निकटमथगतो भृतिरुद्राक्षधृक्सन् ॥३०॥
स्त्रीधर्ममुवाचकुर्मूमितेऽ ध्यायेधिषणोक्त *मुपस्थिताम्* ॥
विंध्याद्रिचरित्र समन्विता गस्त्यर्षिसतीचरितंचसन् ॥३१॥
*रुक्मवती*यू चेमणतांता मष्टसुतासौ भाग्यवतीस्या: ॥
प्रेतमपिद्दा त्रिशइहास्या वल्लभमाशू त्थापयदीश: ॥३२॥
भुजगशिशुभृता नीता कुलयुगिहपुरा ग्न्याढ्यं ॥
स्वपुरमपिसती वेश्याततइहविकप भूपो ॥३३॥
कृतकर *पुट* राजप्रार्थितर्षि: सुतमृतिहतयेरुद्राभिषेकम् ॥
श्रुतिपुरमितसर्गेकारयद्राट्र तनयमुतमृति तो जीवयद्राक् ॥३४॥
सुरहितदकचकथा *वृत्ता* शरपुरमितइहसोमाख्यं ॥
व्रतमपियतइहसीमंति न्यकभदपिचदयितंनष्टम् ॥३५॥
तर्कपूर्युजि *हलमुखी* स्त्रीसुशिक्षणमिषतईट् ॥
आन्हिकाचरणमवद च्छात्तयसंमतमुसुधिये ॥३६॥
प्रमिताक्षरो वितगुरुराहसुत्रि न्सूरपूजना दिसकलान्हिकवित् ॥
अशनादिद्य मंशयनादिविधि स्वरपूमिते त्रहृतभक्तविधि: ॥३७॥
त्रिलोकपर्या सकृतोदनेन संभोजिताबि प्रमुखाअनेन ॥
अष्टत्रियुवते *त्युपजात्* योपि भक्तायदत्रो गुरुणावरोपि ॥३८॥
नवत्रि मितसर्गे व्यधात्स्य विरवंध्यां ॥
कुमार ललितां पि प्पलार्च नतईश: ॥३९॥
खगयुगमितेत्रकुष्ठविनिवृत्यै नरहरयेवदत्ससमिदर्चा ॥
तदुविटपीद्विजश्चणुचिरासी दियमजकीर्तिरे *स्त्रवमालिनी* ॥४०॥
अवदिहपरिक्ष्यसायंदेवं कुयुगमितेभवान्गुरुक्तलब्ध्यै ॥
विधिजमुपगत: *सुपुष्पिताग्रा* गमयनआर्यउवाचकाशियात्रां ॥४१॥
वातोर्मी ति द्वियुगाढयेसर्गे शिष्टांयात्रां कथयन्दर्शयित्वा ॥
काशींदारा दिनुश्चानयित्वा सायंदेवं गुरुराह व्रतंसत् ॥४२॥
सायंदेवाय त्रियुगपरिमितेध्याये प्राहेशोनंत व्रतमिहचयरन्नेष्टं ॥

यस्याचीर्णेन व्यपगतदुरितोयाया त्कौण्डिण्यःपार्थश्वसुगनिमितो *संबाधाम्* ॥४३॥
ह्यगतश्रृति वेदसंमितोस्मि न्ननयद्यतिराजएकरुगः ॥
श्वयगमात्यरतंसतंतुकंचा नयदाशुनिवेद्यराट् चरित्रग् ॥४४॥
यद्वीरासी *भ्दमरविलसिता* नंद्यंवोक्त्या कुरुगृपशमधीः ॥
प्राप्येशंद्रा वसणुचिकविरभृग्दुर्वीक्षातो क्षयुगमितइह ॥४५॥
स्वप्नउपेत्यसआददईशो रसकृतयुक्तद्वहार्चनमग्रचम् ॥
केसरिदत्तमभूभ्दुत *मद्या* त्मकपददस्यकविः सचशिष्यः ॥४६॥
दीपावल्यांस प्रार्थितः सप्तशिष्यैः सप्तग्रामान्त दक्षेत्रसंस्थोप्यगात्सः ॥
अष्टात्माभूत्वा सप्तवेदाढचसर्गे लोकेयन्मूर्ति विंधुता *वैश्वदेवी* ॥४७॥
क्षेत्रगुरुक्तवदशे षमपक्वधान्यं चिच्छंदशूद्रउपगां त्रितिवारग्रंतमि ॥
सिंहोन्नताक्षश्वचात्मवधूंनिवार्य लेभेमितर्धिमिभवे दयुमीशभक्त्या ॥४८॥
सर्गैकवावसंमित *इंद्रवज्रा* लेपोपमाद्यक्षति कृभ्दगिन्याः ॥
तत्क्षेत्रमहात्म्यमुवाचसोष्ट तीर्थानिचाद शंयदत्रसद्भ्यः ॥४९॥
खशरयुतेपुरोक्तरजको भवद्यवनराज आसवृषकृत्
पृथुपिटकस्तदंकउदित स्तदीयशमकृद्विजोनृपकथां ॥
अवदथोवयौसगुरुं स्मृतिप्रथमजन्मनोलभदयो
गतरूगसौसुऱ्यानगमणं गजाश्व *ललितं* पुरंस्वमनयत् ॥५०॥
राजपुरादेत्यसचनिजपीठं कीर्तिरभून्ममसुशुचिर *तन्वी*
स्थेयगिहातः परमिहनसाक्षा दिल्यवनीषुयूजिसचविचार्य ॥
स्वानपिचाश्वास्यबहुवरैदानेः पुष्पकृतासनगतइदमाह
मभ्दजनाद्वःसुगतिरिहतिष्ठे सत्यमितीडरमभवदद्दश्यः ॥५१॥
श्रवणेच्छाश्रृतानांच तदन्येषां स्मृतिर्यतः ॥
सैकपंचाशदध्याय सारभूतार्थमालिका ॥५२॥
तीर्णाआशुतरंत्वस्त्रा तरिष्यंत्यद्यनोनराः ॥
तीर्थंगुरुचरित्रास्य यवगाह्यभिदंबुधैः ॥५३॥

इतिश्री गुरुसंहिता – समश्लोकी गुरुचरिताध्यायसारा व तरणिका समाप्ता ॥
श्रीगुरूदत्तात्रेयपर्णमस्तु

* * *

संदर्भ-

१) महाराष्ट्र महोदय –पूर्वरंग.
२) श्रीनरसिंह सरस्वती चरित्र आणि परंपरा - डॉ. रा. चि. ढेरे
पृष्ठसंख्या- १८१-१८३.

३) श्रीगुरुचरित्र– संपादक रा. कृ. कामत सहावी आवृत्ति– शके १८९०
या ग्रंथाला लिहिलेल्या श्री. अप्रबुद्ध यांच्या 'पुरस्कार' शीर्षक लेखातून उद्धत.
पृष्ठ– ६८२, ८३.

४) श्री. विनायक बाजी चांफेकर यांनी चिंचवड येथे इ. सन् १८६९ त छापलेली शिळाछापी प्रत.

५) श्रीगुरुचरित्र– संपादक रा. कृ. कामत. अध्याय १ ओवी ६६.

६) उपरोक्त– अध्याय १ ओवी ३४.

प्रा. डॉ. बिश्वास पाटील
आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज
शहादा (जि. धुळे.)

संस्कृत साहित्यातील विलक्षण रत्न

प्रा. सिद्धार्थ यशवन्त वाकणकर
एम्. ए.

संस्कृत वाड्.मय जितके (जसे) प्राचीन आहे तितकेच (तसेच) ते विविधतेने नटलेले आहे. त्यामध्ये काव्याला – पद्यबद्ध रचनेला – जास्त मान दिलेला आढळत असला तरीहि 'गद्यं कवीनां निकषं वदन्ति' असे म्हणून गद्यकाव्याला सुद्धा उचित स्थान दिलेले आढळते. भगवान् व्यासांबद्दल 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' असे अभिमानाने उद्गार काढले गेले. व महाभारताच्या सर्वसमावेशक स्वरुपाचे वर्णन करतांना असे उचितपणे लिहिले गेले की 'यदिहास्ति तत्सर्वत्र, यन्नेहास्ति न तत् क्वचित्' म्हणजे महाभारतामध्ये जे विषय वर्णिलेले आहेत ते सर्वत्र दृष्टोत्पत्तीला येतील आणि महाभारतामध्ये ज्या विषयाचे विवेचन आढळत नाही; तो विषय समाजामध्ये कोठेहि मिळणे दुरापास्त आहे. याच धर्तीवर संस्कृत साहित्याबद्दल असे साधार म्हणता येईल की काव्याचे सर्व प्रकार या भाषेमध्यें दिसून येतात. उदा. रामायण, महाभारत यासारखी आर्ष महाकाव्ये, रघुवंश, कुमारसम्भव, किरातार्जुनीय, शिशुपालवध व नैषधीयचरित्र यासारखी संस्कृत काव्याची प्राणभूत असलेली पाच विदग्ध महाकाव्ये, गीतगोविन्दासारखे गीतिकाव्य, मेघदूतासारखे खंडकाव्य किंवा संदेशकाव्य, नीतिशतकासारखी पद्यबद्ध व हितोपदेश – पंचतंत्रासारखी गद्यबद्ध नीतिकाव्यें व शतककाव्यें, कादम्बरी, वासवदत्तासारखी गद्यकाव्यें, रामायणचम्पू, विश्वगुणादर्शम्पू वगैरे चम्पूकाव्ये, अजविलाप, रतिविलापसारख्या विलापिका, स्तोत्र-वाड्.मय, सुभाषित वाड्.मय, सुवर्णमूक्तासंवाद किंवा धूर्त विश्वम्भराचा लक्ष्मी-सरस्वतीवाद यासारखी संवाद–कलहात्मक काव्ये इ. इ. या सर्व साहित्यप्रकाराहून वेगळा असा एक काव्यप्रकार संशोधनकार्यामध्ये दृष्टिपथात आला तो म्हणजे विलक्षण व वेगळीच वैचारिक भूमिका असलेला 'प्रलापिका' या सदरात मोडणारा अज्ञातकवीचा 'उन्मत्तप्रलाप'. एखाद्या उन्मत्त माणसाने जसे असंबद्ध काहीतरी बोलावे किंवा गावे त्याप्रमाणे या काव्याच्या रुपाने कवीने बडबड केलेली आहे. पण ती निरर्थक आहे असे म्हणता येणार नाही कारण कवीने अशा चातुर्याने आपले मत प्रतिपादले आहे की आपल्याला ते सहज पटते व खरेसुद्धा भासते. हे काव्य वेदान्त-

विषयासंबंधी जरी विवेचन करणारे असले तरीहि ते नेहमीच्या चाकोरीबाहेरचे आहे. विषय सनातन असूनहि कवीची मनोवृत्ति पाखंडी या सदरातच मोडेल असे दिसते. नैतिकरीत्या ज्यागोष्टी वाईट, अहितकारी म्हणून मानल्या गेलेल्या आहेत, त्या कशा चांगल्या आहेत, म्हणजे दोष हे गुणच आहेत, हे सिद्ध करणे हे या काव्याचे ठळक वैशिष्टय. केवळ २८ अनुष्टुभ् श्लोकांच्या माध्यमाने कवीने आपल्या परंपरेला न जुमानणारा दृष्टिकोन यशस्वीरीत्या प्रस्तुत केला आहे. अशा या अद्भुत, अपूर्व व दुर्लभ काव्याचा परिचय करुन देणे, हा या छोटेखानी लेखाचा उद्देश आहे.

पहिल्याच श्लोकामध्ये कवि असे विधान करतो की शुद्धज्ञानरुपी अमृताचा आस्वाद घेण्याची इच्छा असणारा मी उन्मत्त माणसासारखा (म्हणजे मी उन्मत्त नाही असे कवि सुचवीत आहे) प्रलाप करीत आहे. व त्या माझ्या प्रलापाचा अर्थ गुप्त (गूढ) आहे व सज्जन माणसांनी आपल्या बुद्धिवैभवाने त्याचा बोध करुन घ्यावा. कामक्रोधादि षड्रिपु संसार पार करण्यासाठी कसे उपयोगी आहेत त्याचे विवरण ऐका असे म्हणून तिसऱ्या श्लोकापासून कवि आपले मत सिद्ध करण्यासाठी हिन्दुदैवतशास्त्रातील दृष्टान्त देत आहे. त्यापैकीं काही भाषान्तररुपाने मी देत आहे. यातील प्रत्येक श्लोकातून कवि असे सूचित करीत आहे की, देवांनी प्रकट केलेल्या क्रोध वगैरे गुणांच्या उपासनेने मोक्ष मिळेल. उदा. ज्या नृसिहाने हिरण्यकश्यपुची छाती फाडली तो क्रोधी नृसिह मुक्ति देणारा आहे. शाश्वत गोष्टींबद्दल जे प्रसन्नता बाळगतात व नश्वर गोष्टींकडे जे तुच्छतेने पहातात असा राग (अनुराग, आसक्ति प्रेम) द्वेष असणाऱ्या माणसांच्या तळहातावर मुक्ति असते. माझ्याहून कोणीहि श्रेष्ठ नाही. मीच महेश्वर आहे, मीच सर्वोत्तम आहे, अशाप्रकारचा मद मुक्तिप्रद मानला गेला आहे. ज्या कामक्रोधादि महाधूर्तांनी या जगत्त्रयाला फसवले आहे, अशा धूर्तांना जो चातुर्याने (युक्तिने) फसवितो (म्हणजे त्यांच्या जाळयात अडकत नाही) तो धूर्जटिला म्हणजे शंकराला प्रिय होतो. या सर्व सगुण जगामध्ये जो आपल्या मनाचा दोषच (या जगामध्ये लिप्त होणे हा) कानांत नित्य सांगत असतो तो चहाडखोर मुक्ति मिळवतो. विचार, आचार वगैरे पूर्वी जे मित्र होते त्यांना सोडून जो त्यांच्यापलिकडे जातो असा मित्रद्रोहीसुद्धा या संसारापासून मुक्त होतो. ज्याने आपल्या मायेच्या साहाय्याने हे पंचभौतिक विश्व निर्माण केले तो मुक्ति देणार मायावीं मी पहिला आहे. ज्याने आपल्या इच्छेनेच हे विश्वनिर्माण केले व जो स्वेच्छेनेंच त्याचा नाश करतो तो कृतज्ञापेक्षाहि पूज्य असलेला कृतघ्न मोक्ष मिळवतो. सर्व गुणांमध्ये दोष पहाणारे, सर्व विश्वमात्राची निंदा करणारे व आत्मस्तुति (परमात्म्याची स्तुति) करणारे लोक वैकुंठमंदिराला जातात. ज्ञानरुपीं तीक्ष्ण तलवारीनें मोह, अहंकार, दुर्बुद्धि इत्यादिकांचा जो घात करतो असा माणूस

शतजन्मामध्ये मिळविलेल्या पापांचा नाश करतो; विधिनिषेधांचा विचार न करता जो माणूस स्वेच्छेने इकडे तिकडे विहार करत असतो व त्यामुळे जो कर्मठ लोकाच्या पंक्तिमध्ये बसू शकत नाहीं असा माणूस इतर पंक्तिना पावन करतो.

विवेचन–

हिन्दु धर्मातील अत्यंत समर्पक व मार्मिक उदाहरणे देऊन कवीने जरी आपले मत दृढबल करण्याचा – त्याला दुजोरा देण्याचा – प्रयत्न केला असला तरीहि हें काव्य गंभीरवृत्तीनें रचलेले आहे असे वाटत नाही. सर्वांना ज्ञात असलेल्या नृसिहादि दृष्टांतांनी कवि आपलें मत सत्य आहे हे वारंवार पटवून देत आहे. क्रोध वगैरे विशेष भाव देवांनी जरी काही वेळेस प्रकट केलेले असले तरीहि ते गुण त्या देवांच्या व्यक्तिमत्वाचे अविभाज्य घटक नाहीत हे येथे लक्षात ठेवावयास हवे. ही सर्व ईश्वराची लीला आहे. आणि देव आपल्या भक्तांकरितां कोणतेहि भव्य दिव्य करु शकतात, हें पटवून देण्यासाठीच त्या लीला प्रकट केल्या गेल्या. या लीलांमुळे भक्तद्रोही माणसांच्या मनामध्य निश्चितच भय निर्माण होते. परंतु येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की या गोष्टींचा – भावांचा – केवळ देवच आधार घेऊ शकतात मानवाने जर असे कृत्य केले तर त्याला समाजाची मान्यता मुळीच मिळणार नाही. जरी विष्णूने क्रोधी नृसिहाचे रौद्र व भीषण रुप धारण केले तरीहि जेव्हा प्रल्हादाने त्याची हात जोडून प्रार्थना केली तेव्हा तोच देव क्षणार्धात प्रसन्न, स्मितमुख व हितकारक रुप धारण करता झाला. अशाप्रकारचा क्रोधाचा आविष्कार भीतीने भारलेल्या घरामध्येच सहन केला जाईल, इतरत्र नाही. म्हणून अशाप्रकारचा क्रोध आत्मसाक्षात्कारासाठी मुळीच उपयुक्त नाही. या ठिकाणी क्रोध हा स्वभावगुण महत्वाचा नसून तो केव्हा, कशासाठी व कां प्रकट केला गेला तीं परिस्थिती महत्वाची आहे. माणसाच्या बाबतीत जे नीतिबाह्य आहे ते देवाच्या संदर्भात तसे नसते. तो देव सर्व खेळ करु शकतो. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. भर्तृहरि व शेक्सपीअर् यांनी असे म्हटले आहे की माणूस म्हणजे जगाच्या रंगभूमीवरील एक नट आहे आणि तो कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे देवाकडून नियंत्रित केला जातो. मला असे वाटते कीं, देव हाच सर्वश्रेष्ठ नट आहे व तो सर्व नाटके आपल्या भक्तांच्या हिताकरिताच करीत असतो. त्यामध्ये त्याचा यत्किंचितही स्वार्थ नसतो किंवा आपल्या सत्–चित्–आनंद स्वरुपाची सुद्धा त्याला जाहिरात करायची गरज नसते.

अशा प्रकारच्या काव्याच्या उपलब्ध असलेल्या या उदाहरणावरुन असे विधान करतां येईल की संस्कृत साहित्याच्या इतिहासात सुद्धा अशा प्रकारचा परंपरेला धक्का देणारा विचार करण्याची वृत्ति दिसून येते.

॥ श्री ॥

श्रीगणेशाय नमः ॥ *अयोन्मत्तप्रलापकम्* ।

शुद्धबोधसुधास्वादी प्रलपामि प्रमत्तवत् ।
तत्प्रलापं निगूढार्थं साधयन्तु सतांधियः ॥१॥
कामः क्रोधश्च लोभश्च मोहश्च मदमत्सरौ ।
संसारतारणोपायास्तेषां विवरणं शृणु ॥२॥
विश्रान्ति सुन्दरीदत्तरतिलावण्यलम्पटाः ।
एकान्तलीलाचतुराः कामिनो मुक्तिगामिनः ॥३॥
यद्बलान्मोहदैव्यस्य योगी नरहरिः स्वयम् ।
वक्षोविदारयाऽचक्रे स क्रोधी मुक्तिभाजनम् ॥४॥
भृकुटी कुटिलं यस्य मुखमीक्षितुमक्षमाः ।
लाभलोभादयो भावाः सद्वेषी केशवप्रियः ॥५॥
शाश्वते सुप्रसन्नानां नश्वरे भृकुटीभृताम् ।
रागद्वेषवतां तात मुक्तिः करतले स्थिता ॥६॥
येन वर्णाश्रमाचार देहभोग धनादिषु ।
मुह्यन्ति गलितात्मानः स मोहः परमं पदम् ॥७॥
मतो नान्यत्परं किञ्चिदहमेव महेश्वरः ।
अहमेवोत्तमश्चेति मदो मुक्तिप्रदो मतः ॥८॥
दृश्योत्कर्षं न सहते दृगुत्कर्षबलात्तु यः ।
स नु संवत्सरशतं जेष्टो निर्मत्सरान्मुनेः ॥९॥
क्षणं न क्षमते यस्तु बाह्यस्फुरणमक्षमी ।
तद्दामचरणाम्भोजें निबद्धाः क्षमिणां गुणाः ॥१०॥
कामादयो महाधूर्ता धूर्तितं यैर्जगत्त्रयम् ।
तान् धूर्तयति यो युक्त्या स धूर्तो धूर्जटिप्रियः ॥११॥
यौलालयति लोभादीनन्तमूंलानि कृन्तति ।
बहिरन्योन्य एवायमन्तर्गतकपर्दसौ ॥१२॥
गुणात्मिकेषु सर्वेषु दोषमेवान्तरात्मनः ।
कर्णे जपति यो नित्यं पिशुनोऽडली विभुक्तिभाक् ॥१३॥
परापवाद एवास्ति हृदये यस्य सर्वदा ।
पारङ.गतोऽसौ दृष्टश्च समयी मुनिशेखर ॥१४॥
मिथ्यैवेदं जगत्सर्वमिति निश्चितचेतसाम् ।
ऐते मिथ्यावादिनो लोके दुर्लभाः सत्यवादिनाम् ॥१५॥
नैव किञ्चित्करोमीति यः सदाचारवर्जितः ।

आचारिणो न गच्छन्ति तस्यानाचारिणोगतिम् ॥१६॥
पूर्वं तु यानि मित्राणि विचारादीनि तान्यपि ।
विहाय तत्परं याति मित्रद्रोही समुच्यते ॥१७॥
पञ्चभूतमकं विश्वं निर्मितं येन मायया ।
स एव हि मया दृष्टो मायावी मुक्तिभाजनम् ॥१८॥
स्वेच्छयैव कृतं विश्वं स्वेच्छयैव निहन्ति यः ।
कृतज्ञादपि पूज्योऽसौ कृतघ्नो मोक्षमश्नुते ॥१९॥
आश्चर्यं योऽभिमन्येत जीव आत्मानमीश्वरम् ।
सोऽभिमानी गतिं याति साधूष्वापि स पूज्यते ॥२०॥
गणेषु दोषं पश्यन्तो विश्वमात्रविनिन्दकाः
आत्मस्तुतिपरा यान्ति नित्यं वैकुण्ठमन्दिरम् ॥२१॥
बुद्ध्वापि शुद्धमात्मानं व्यावहारिकलोकवत् ।
करोमि न करोमीति दम्भकृत् शम्भुवल्लभः ॥२२॥
धर्माधर्मविनिर्मुक्ता अपि धर्मपथे स्थिताः ।
ये धर्मध्वजिनस्तेषां वन्द्याश्चरणरेणवः ॥२३॥
बोधखड्गेन तीक्ष्णेग मोहाहङ्कारदुर्धियाम् ।
घातकः पातकं हन्ति पुरुषजन्मशतार्जितम् ॥२४॥
अहङ्कारं हरिहरं ब्रह्मैवाहमहं शिवः ।
इति विश्वासहन्तारः पुण्या विश्वासघातकाः ॥२५॥
भवेतां कर्ममार्गस्थौ तावुभावपि निन्दितौ ।
अस्माकमभिनिर्मुक्ताभ्मुदितौ पङ्क्तिपावनौ ॥२६॥
मुक्तो विधिनिषेधाभ्यां निश्चितः स्वेच्छयाचरन् ।
कर्मस्थानामपाङ्क्तयः सोऽस्माकं पङ्क्तिपावनः ॥२७॥
दत्वा वारिकपाटंय्य खण्डलाडुकवन्मुनिः ।
एकाकी मिष्टमश्नाति स याति परमांगतिम् ॥२८॥

॥ श्री विश्वनाथाय नमः ॥

मेवाडाज्ञाति भरुचना भट्ट लक्ष्मीरामे लख्यु छे.

प्रा. सिद्धार्थ यशवन्त वाकणकर (एम्. ए.)
(बडोदे)

श्रीमंत दुसरे बाजीराव साहेबांच्या कन्या श्रीमती कुसुमाबाई बयाबाई साहेब आपटे यांचे इंग्रजांवरील विश्वासाबद्दलचे पत्र

– य. रा. गुप्ते

(कै. य. रा. गुप्ते यांचा "चिमणाजीरावांची दुर्दशा" हा अप्रकाशित लेख आम्ही सप्टेंबर १९८४ या 'संशोधक' मध्ये प्रसिद्ध केला आमच्या संग्रही असलेला दुसरा अप्रकाशित लेख या अंकात प्रकाशित करीत आहोत.)

– संपादक

श्रीमती कुसुमाबाई बयाबाईसाहेब आपटे या श्रीमंत पंडित पंत प्रधान (त्यांचे आवडते अभिधान) अथवा ब्रह्मावर्ती गेल्यापासून महाराज संबोधण्यांत येणारे दुसरे बाजीराव साहेब यांच्या द्वितीय कन्या होत. त्यांस सरस्वतीबाईसाहेब आपटेहि म्हणत. त्यांचे छायाचित्र कै, रा. ब. द. ब. पारसनीस यांनी इतिहास-संग्रहात दिले आहे.[1] ते वैधव्यदशेतील होय. दुसरे चित्रावरुन तयार केलेले मी सह्याद्रींत घातले आहे.[2] ते सुवासिनी असतांनाचे अंदाज त्या तीस पसतीस वयाच्या असताचे आहे. तिसरे मला उपलब्ध झाले आहे ते त्या चवदा पंधरा वर्षांच्या असतां-वेळचे म्हणजे लग्नानंतर चारपांच वर्षांचे दिसते.

बयाबाईंची हकीकत रा. ब. पारसनीसांनी इतिहास-संग्रह, ऐतिहासिक स्फुट लेख पृ. २४ २५ वर दिली आहे. त्यानंतर मी सह्याद्रि खं. १६ अं. ५ पृ. ७८ १-२ यांत व विविधवृत्त ९ जुलै इ. स. १९४४ यांत पृ. १० वर जोगेश्वरी जवळील भिडयांच्या वाडयांची माहिती देतांना आणखी प्रसिद्ध केली.

श्रीमंत लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते पेशवे हे क्षेत्र काशी येथे गेले होते. त्यास पेशव्यांच्या कूलांतील व्यक्तींचीं जेवढी माहिती तेथे मिळेल तेवढी शोधून आणण्यास मी विनंति केली होती. मी काशीस असतां मला पुराणवस्तु संशोधनाचे काम मनस्वी असल्यामुळे ऐतिहासिक कागद साध्य करुन घेण्यास अवकाश नव्हता.

दु बाजीराव साहेबांचे धाकटे बंधु चिमाजी आप्पा यांच्या कन्या द्वारकाबाई या श्रीमंत लक्ष्मणरावांच्या आजी. लक्ष्मणरावांस दुसऱ्या बाजीराव साहेबांच्या पत्नी सईबाई यांनी दत्तक घेतले होते. तेव्हा ते बयाबाईसाहेबांचे बंधुहि होतात. त्यांचे वडील दुसऱ्या चिमाजी आप्पांचे नातू त्यांस बयाबाई साहेबांनी लष्कर नजीक ग्वालेरहून मि. वै. व. ७ गुरुवार शके ९३ म्हणजे १९७३ रोजी पत्र लिहिले. त्याची चिमाजीच्या हातची नक्कल लक्ष्मणरावास त्यांच्या दप्तरांत उपलब्ध झाली ती त्यांनी मला दाखविली. ती खाली देत आहे या तिथीस इं ता. ११ मे इ. स. १८७१ येते.

चिमाजी आप्पासाहेब इंग्रज सरकारकडे अर्ज करीत होते. " त्या अर्जाबरोबर आपल्याबद्दलहि अर्ज करावा, अनमान करू नये, कारण बलण्याच्या पूर्वीपासून म्हणजे १८५७ इ. च्या बंडापूर्वीपासून आपली व्यवस्था त्या सरकारास अर्थात् इंग्रज सरकारास जाहीर आहे. यास्तव अशा दुर्धर प्रसंगांतून त्यांनी आम्हास व तुम्हांस आश्रय दिला तेव्हां त्याचे वैशिष्ठ्य काय वर्णावे ? ज्यांनी असा अंगिकार केला ते या प्रसंगी आपले पोषण करण्याविषयी उपेक्षा कधीहि करणार नाहीत. श्रीमंत महाराजांचे पश्चात् म्हणजे बाजीराव कैलासवासी झाल्यावर सर्वोपरि इश्वरतीने आपला सांभाळ करणार तेच सरकार अर्थात् इंग्रज सरकार आहेत; आम्ही स्त्री व्यक्ति व पराधीन स्वत: उद्योग करु शकत नाही व तुम्हाखेरीज स्वकीय आप्त आणि विश्वासू अन्य कोणी नाही " वगैरे मजकुर पत्रांत आहे. यावरुन बयाबाई साहेबांचा इंग्रजांवर व लक्ष्मणरावांचे वडिलांवर मोठा भरवसा होतासे दिसते.

रा. सं. मं. च्या संग्रही श्रीमंत लक्ष्मणरावांचे–सईबाईच्या पर्यायाने महाराज बाजीराव साहेबांच्या दत्तक पुत्राचे–हस्ताक्षर असावे यासाठी वरील पत्राची नक्कल त्यांनीच करुन देण्यास मी विनंति केली व त्यांनी ती केली. रुजुवात मात्र मी घेतली.

(मोडी) श्री शिव

चिरंजीव सहस्रायु रा. चिमणाजीराव आपासो. यथें मु॥ श्रीकाशी याशि प्रति– सौ. कुसुमाबाई बयासो. आपटे अनेक अशिर्वाद वि. तुम्हा कडील मजकुर पेशजी उपाधिण बाई याणी सांगीतल्यावरुन विदित होऊन संतोष जाहाला. तुम्हास आम्हा कडील मजकुर माहितच आहे. त्याप्रमाणें तुम्ही आपले अर्जाबरोबर आम्हा विषईचा अर्ज गव्हरमिंट सरकारास अवश्य करावा अनमान करु नयें कारण बलव्याचे पूर्वीपासून आपली व्यवस्था तर सरकारास जाहीर आहे. यास्तव अशा दुर्धर प्रसंगातून

त्याणी आम्हास व तुम्हास आपले जवळ आश्रय दिला तेव्हा त्यांची विशेषता काय वर्णावयाची ? तरि ज्याणी असा अंगिकार केला ते याप्रसंगी आपले पोषण करण्याविषई उपेक्षा कधिही करणार नाहीत. आता ती श्रीमंत महाराजांचे पश्चात सर्वोपरी इज्जतीने आपला सांभाळ करणार तेंच सरकार आहेत दुसरे कोणी नाही हे तुम्ही जाणितच आहां, का कि आम्ही स्त्री व्यक्ती आणि तशात परस्वाधीन यामुळे स्वतः आम्ही उद्योग करु सकत नाही व तुम्हा खेरीज आमचा स्वकीय आप्त आणि विश्वासु कही अन्य कोणी नाही हे तुम्हास माहित आहे. याकरिता त्यांचे हुजूर हाजर होऊन आमचा वाका निवेदन करण्यास व त्याबद्दल हर एक प्रकारची आम्हा कडून मदतगारी करण्यास्तव तुम्हास कुलअखत्यार आम्ही दिला आहे. ये विषई आता अनमान किमपीही करु नये. सबब हे पत्र तुम्हास मुद्दाम पाठविले आहे. पांवल्याचे उत्तर आपले कडील कुशल वृत्तासह जरुर सत्वर पाठवावे कळावे बहूत काय लिहिणे हे अशिर्वाद मि. वै. व. ७ शके ९३ मु॥ लष्कर नजीक ग्याल्हेर.

(सही) कुसुमाबाई बयासो. द. खु.

मे ११ इ. स, १८७१

***

संदर्भ-

१ इतिहास संग्रह, ऐतिहासिक स्फुट लेख, पृ. २४-२५ दर्म्यांन.
२ खं. १६ अं. ५ पृ. ७८१.

॥ श्री विश्वनाथो विजयते ॥

राजवाडे मंडळ प्रकाशने

मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या ग्रंथांची यादी

१) राजवाडे मराठी धातू कोश	पृष्ठे ३७०	रुपये ३०
२) राजवाडे नामादी व्युत्पत्ती कोश	" ३५०	" ३०
३) समर्थ शिवाजी अन्योन्य संबंध (भा. रा. भट)	" १०९	" ०५
४) ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे संस्कृत रुपांतर (वि. का. राजवाडे)	" १८३	" ०७
५) राजस्थान महाराष्ट्र संघर्ष (शु. पु. जोशी)	" ३००	" १२
६) राजवाडे चरित्र (भा. वा. भट)	" ६३२	" ५०
७) मराठ्यांचा इतिहासाची साधनें (मो. रा. जोशी)	" ६६०	" ५०
८) ऋगवेदातील ज्योतिष मूलक कालनिर्णायक गमके	" १००	" ०७
९) संस्कृत भाषेचा उलगडा (वि. का. कुळकर्णी)	" २१०	" १०
१०) जानकी स्वैंवर (सं. द. रा. भट)	" २८८	" २०
११) आज्ञापत्र (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित		" २०
१२) अमृतानुभव (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखीत		" ४१
१३) योगचिंतामणी (ऑफसेट प्रिंट)		" ४१
१४) वेडिया नागेश (सं. डॉ. मु. ब. शहा)		" १०
१५) छत्रपतींची १०९ कलमी बखर (सं. डॉ. प्र. न. देशपांडे)		" १०
१६) ज्ञानेश्वरी पदकोश (श्री. शिवाजीराव भावे)		" १००
१७) संशोधक, "सुवर्ण महोत्सवी अंक"	पृष्ठे ३००	" ४०

विक्रीसाठी ठेवलेले इतर ग्रंथ

१) छ. शिवाजी महाराजांची पत्रे (डॉ. प्र. न. देशपांडे)	पृष्ठे ३००	रुपये ६५

विशेष सवलत :- वरील १८ पुस्तकांचा संच किंमत रुपये ५४८ चा केवळ रुपयें ४०० ला मिळेल. २ अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमीशन. काही ग्रंथाच्या प्रती अगदीच मर्यादित. टपाल खर्च वेगळा लागेल.

संशोधक त्रैमासिक :- इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेलें दर्जेदार त्रैमासिक गेली ५२ वर्षे प्रकाशित होत आहे वार्षिक वर्गणी फक्त रु. १५/- प्रत्येक अंक किंमत रु. ०५/- ५२ वर्षातील उपलब्ध असलेल्या सर्व अंकाचा संच केवळ रु. ३००/- त उपलब्ध (त्यात सुवर्ण महोत्सवी अंक रु. ४०/-, योगचिंतामणी . ४१/-, आज्ञापत्र रु. २०/- समाविष्ठ.)

चिटणीस,

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

॥ श्री ॥

श्रीगणेशाय नमः ॥ *अयोन्मत्तप्रलापकम्* ।
शुद्धबोधसुधास्वादी प्रलपामि प्रमत्तवत् ।
तत्प्रलापं निगूढार्थं साधयन्तु सतांधियः ॥१॥
कामः क्रोधश्च लोभश्च मोहश्च मदमत्सरौ ।
संसारतारणोपायास्तेषां विवरणं शृणु ॥२॥
विश्रान्ति सुन्दरीदत्तरतिलावण्यलम्पटाः ।
एकान्तलीलाचतुराः कामिनो मुक्तिगामिनः ॥३॥
यद्बलान्मौहृदैव्यस्य योगी नरहरिः स्वयम् ।
वक्षोविदारयाऽचक्रे स क्रोधी मुक्तिभाजनम् ॥४॥
भृकुटी कुटिलं यस्य मुखमीक्षितुमक्षमाः ।
लाभलोभादयो भावाः सद्वेषी केशवप्रियः ॥५॥
शाश्वते सुप्रसन्नानां नश्वरे भृकुटीभृताम् ।
रागद्वेषवतां तात मुक्तिः करतले स्थिता ॥६॥
येन वर्णाश्रमाचार देहभोग धनादिषु ।
मुह्यन्ति गलितात्मानः स मोहः परमं पदम् ॥७॥
मतो नान्यत्परं किञ्चिदहमेव महेश्वरः ।
अहमेवोत्तमश्चेति मदो मुक्तिप्रदो मतः ॥८॥
दृश्योत्कर्षं न सहते दृगुत्कर्षबलात्तु यः ।
स नु संवत्सरशतं जेष्टो निर्मत्सरान्मुनेः ॥९॥
क्षणं न क्षमते यस्तु बाह्यस्फुरणमक्षमी ।
तव्दामचरणाम्भोजें निबद्धाः क्षमिणां गुणाः ॥१०॥
कामादयो महाधूर्ता धूर्तितं यैर्जगत्त्रयम् ।
तान् धूर्तयति यो युक्त्या स धूर्तो धूर्जटिप्रियः ॥११॥
यौलालयति लोभादीनन्तमूंलानि कृन्तति ।
बहिरन्योन्य एवायमन्तर्गतकपर्ध्वंसौ ॥१२॥
गुणात्मिकेषु सर्वेषु दोषमेवान्तरात्मनः ।
कर्णे जपति यो नित्यं पिशुनोडलौ विभुक्तिभाक् ॥१३॥
परापवाद एवास्ति हृदये यस्य सर्वदा ।
पारङगतोऽसौ दृष्टश्च समयी मुनिशेखख ॥१४॥
मिथ्यैवेदं जगत्सर्वमिति निश्चितचेतसाम् ।
ऐते मिथ्यावादिनो लोके दुर्लभाः सत्यवादिनाम् ॥१५॥
नैव किञ्चित्करोमीति यः सदाचारवर्जितः ।

आचारिणो न गच्छन्ति तस्यानाचारिणोगतिम् ॥१६॥
पूर्वं तु यानि मित्राणि विचारादीनि तान्यपि ।
विहाय तत्परं याति मित्रद्रोही समुच्यते ॥१७॥
पञ्चभूतमकं विश्वं निर्मितं येन मायया ।
स एव हि मया दृष्टो मायावी मुक्तिभाजनम् ॥१८॥
स्वेच्छयैव कृतं विश्वं स्वेच्छयैव निहन्ति यः ।
कृतज्ञादपि पूज्योऽसौ कृतघ्नो मोक्षमश्नुते ॥१९॥
आश्चर्यं योऽभिमन्येत जीव आत्मानमीश्वरम् ।
सोऽभिमानी गतिं याति साधूष्वापि स पूज्यते ॥२०॥
गणेषु दोषं पश्यन्तो विश्वमात्रविनिन्दकाः
आत्मस्तुतिपरा यान्ति नित्यं वैकुण्ठमन्दिरम् ॥२१॥
बुद्ध्वापि शुद्धमात्मानं व्यावहारिकलोकवत् ।
करोमि न करोमीति दम्भकृत् शम्भुवल्लभः ॥२२॥
धर्माधर्मविनिर्मुक्ता अपि धर्मंपथे स्थिताः ।
ये धर्मध्वजिनस्तेषां वन्द्याश्चरणरेणवः ॥२३॥
बोधखड्गेन तीक्ष्णेग मोहाहङ्कारदुर्धियाम् ।
घातकः पातकं हन्ति पुरुषजन्मशतार्जितम् ॥२४॥
अहङ्कारं हरिहरं ब्रह्मैवाहमहं शिवः ।
इति विश्वासहन्तारः पुण्या विश्वासघातकाः ॥२५॥
भवेतां कर्ममार्गस्थौ तावुभावपि निन्दितौ ।
अस्माकमभिनिर्मुक्ताभ्मुदितौ पङ्क्तिपावनौ ॥२६॥
मुक्तो विधिनिषेधाभ्यां निश्चितः स्वेच्छयाचरन् ।
कर्मस्थानामपाङ्क्तयः सोऽस्माकं पङ्क्तिपावनः ॥२७॥
दत्त्वा वारिकपाटंय्य खण्डलाडुकवन्मुनिः ।
एकाकी मिष्टमश्नाति स याति परमांगतिम् ॥२८॥

॥ श्री विश्वनाथाय नमः ॥

मेवाडाज्ञाति भरुचना भट्ट लक्ष्मीरामे लख्यु छे.

प्रा. सिद्धार्थ यशवन्त वाकणकर (एम्. ए.)
(बडोदे)

श्रीमंत दुसरे बाजीराव साहेबांच्या कन्या श्रीमती कुसुमाबाई बयाबाई साहेब आपटे यांचे इंग्रजांवरील विश्वासाबद्दलचे पत्र

– य. रा. गुप्ते

(कै. य. रा. गुप्ते यांचा " चिमणाजीरावांची दुर्दशा " हा अप्रकाशित लेख आम्ही सप्टेंबर १९८४ या 'संशोधक' मध्ये प्रसिद्ध केला आमच्या संग्रही असलेला दुसरा अप्रकाशित लेख या अंकात प्रकाशित करीत आहोत.)

– संपादक

श्रीमती कुसुमाबाई बयाबाईसाहेब आपटे या श्रीमंत पंडित पंत प्रधान (त्यांचे आवडते अभिधान) अथवा ब्रह्मावर्ती गेल्यापासून महाराज संबोधण्यांत येणारे दुसरे बाजीराव साहेब यांच्या द्वितीय कन्या होत. त्यांस सरस्वतीबाईसाहेब आपटेहि म्हणत. त्यांचे छायाचित्र कै, रा. ब. द. ब. पारसनीस यांनी इतिहास–संग्रहात दिले आहे.[1] ते वैधव्यदशेतील होय. दुसरे चित्रावरुन तयार केलेले मी सह्याद्रींत घातले आहे.[2] ते सुवासिनी असतांनाचे अंदाज त्या तीस पसतीस वयाच्या असताचे आहे. तिसरे मला उपलब्ध झाले आहे ते त्या चवदा पंधरा वर्षांच्या असतांवेळचे म्हणजे लग्नानंतर चारपांच वर्षांचे दिसते.

बयाबाईंची हकीकत रा. ब. पारसनीसांनी इतिहास-संग्रह, ऐतिहासिक स्फुट लेख पृ. २४ २५ वर दिली आहे. त्यानंतर मी सह्याद्रि खं. १६ अं. ५ पृ. ७८ १–२ यांत व विविधवृत्त ९ जुलै इ. स. १९४४ यांत पृ. १० वर जोगेश्वरी जवळील भिडयांच्या वाडयांची माहिती देतांना आणखी प्रसिद्ध केली.

श्रीमंत लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते पेशवे हे क्षेत्र काशी येथे गेले होते. त्यास पेशव्यांच्या कूळांतील व्यक्तींचीं जेवढी माहिती तेथे मिळेल तेवढा शोधून आणण्यास मी विनंति केली होती. मी काशीस असतां मला पुराणवस्तु संशोधनाचे काम मनस्वी असल्यामुळे ऐतिहासिक कागद साध्य करुन घेण्यास अवकाश नव्हता.

दु बाजीराव साहेबांचे धाकटे बंधु चिमाजी आप्पा यांच्या कन्या द्वारकाबाई या श्रीमंत लक्ष्मणरावांच्या आजी. लक्ष्मणरावांस दुसऱ्या बाजीराव साहेबांच्या पत्नी सईबाई यांनी दत्तक घेतले होते. तेव्हा ते बयाबाईसाहेबांचे बंधुहि होतात. त्यांचे वडील दुसऱ्या चिमाजी आप्पांचे नातू त्यांस बयाबाई साहेबांनी लष्कर नजीक ग्वालेरहून मि. वै. व. ७ गुरुवार शके ९३ म्हणजे १९७३ रोजी पत्र लिहिले. त्याची चिमाजीच्या हातची नक्कल लक्ष्मणरावास त्यांच्या दप्तरांत उपलब्ध झाली ती त्यांनी मला दाखविली. ती खाली देत आहे या तिथीस इं ता. ११ मे इ. स. १८७१ येते.

चिमाजी आप्पासाहेब इंग्रज सरकारकडें अर्ज करीत होते. "त्या अर्जाबरोबर आपल्याबद्दलहि अर्ज करावा, अनमान करू नये, कारण बलण्याच्या पूर्वीपासून म्हणजे १८५७ इ. च्या बंडापूर्वीपासून आपली व्यवस्था त्या सरकारास अर्थात् इंग्रज सरकारास जाहीर आहे. यास्तव अशा दुर्धर प्रसंगांतून त्यांनी आम्हास व तुम्हांस आश्रय दिला तेव्हां त्याचे वैशिष्ठ्य काय वर्णावे ? ज्यांनी असा अंगिकार केला ते या प्रसंगी आपले पोषण करण्याविषयी उपेक्षा कधीहि करणार नाहीत. श्रीमंत महाराजांचे पश्चात् म्हणजे बाजीराव कैलासवासी झाल्यावर सर्वोपरि इश्वरीने आपला सांभाळ करणार तेच सरकार अर्थात् इंग्रज सरकार आहेत; आम्ही स्त्री व्यक्ति व पराधीन स्वतः उद्योग करु शकत नाही व तुम्हाखेरीज स्वकीय आप्त आणि विश्वासू अन्य कोणी नाही" वगैरे मजकुर पत्रांत आहे. यावरुन बयाबाई साहेबांचा इंग्रजांवर व लक्ष्मणरावांचे वडिलांवर मोठा भरवसा होतासे दिसते.

रा. सं. मं. च्या संग्रही श्रीमंत लक्ष्मणरावांचे–सईबाईच्या पर्यायाने महाराज बाजीराव साहेबांच्या दत्तक पुत्राचे–हस्ताक्षर असावे यासाठी वरील पत्राची नक्कल त्यांनीच करुन देण्यास मी विनंति केली व त्यांनी ती केली. रुजुवात मात्र मी घेतली.

(मोडी) श्री शिव

चिरंजीव सहस्त्रायु रा. चिमणाजीराव आपासो. थंत्थें मु॥ श्रीकाशी याशि प्रति– सौ. कुसुमाबाई बयासो. आपटे अनेक अशिर्वाद वि. तुम्हा कडील मजकुर पेशजी उपाधिण बाई याणी सांगीतल्यावरुन विदित होऊन संतोष जाहाला. तुम्हास आम्हा कडील मजकुर माहितच आहे. त्याप्रमाणें तुम्ही आपले अर्जाबरोबर आम्हा विषईचा अर्ज गव्हर्नमेंट सरकारास अवश्य करावा अनमान करु नयें कारण बलव्याचे पूर्वीपासून आपली व्यवस्था तर सरकारास जाहीर आहे. यास्तव अशा दुर्धर प्रसंगातून

त्याणी आम्हास व तुम्हास आपले जवळ आश्रय दिला तेव्हा त्यांची विशेषता काय वर्णावयाची ? तरि ज्याणी असा अंगिकार केला ते याप्रसंगी आपले पोषण करण्याविषई उपेक्षा कधिही करणार नाहीत. आता ती श्रीमंत महाराजांचे पश्चात सर्वोपरी इज्जतीने आपला सांभाळ करणार तेच सरकार आहेत दुसरे कोणी नाही हे तुम्ही जाणितच आहां, का कि आम्ही स्त्री व्यक्ती आणि तशात परस्वाधीन यामुळे स्वत: आम्ही उद्योग करु सकत नाही व तुम्हा खेरीज आमचा स्वकीय आप्त आणि विश्वासु कही अन्य कोणी नाही हे तुम्हास माहित आहे. याकरिता त्यांचे हुजूर हाजर होऊन आमचा वाका निवेदन करण्यास व त्याबद्दल हर एक प्रकारची आम्हा कडून मदतगारी करण्यास्तव तुम्हास कुलअखत्यार आम्ही दिला आहे. ये विषई आता अनमान किमपीही करु नये. सबब हे पत्र तुम्हास मुद्दाम पाठविले आहे. पांवल्याचे उत्तर आपले कडील कुशल वृत्तासह जरुर सत्वर पाठवावे कळावे बहूत काय लिहिणे हे अशिर्वाद मि. वै. व. ७ शके ९३ मु॥ लष्कर नजीक ग्याल्हेर.

(सही) कुसुमाबाई बयासो. द. खु.

मे ११ इ. स, १८७१

* * *

संदर्भ-

१ इतिहास संग्रह, ऐतिहासिक स्फुट लेख, पृ. २४-२५ दर्म्यांन.
२ खं. १६ अं. ५ पृ. ७८१.

॥ श्री विश्वनाथो विजयते ॥

राजवाडे मंडळ प्रकाशने

मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या ग्रंथांची यादी

१) राजवाडे मराठी धातू कोश	पृष्ठे ३७०	रुपये ३०
२) राजवाडे नामादी व्युत्पत्ती कोश	" ३५०	" ३०
३) समर्थ शिवाजी अन्योन्य संबंध (भा. रा. भट)	" १०९	" ०५
४) ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे संस्कृत रुपांतर (वि. का. राजवाडे)	" १८३	" ०७
५) राजस्थान महाराष्ट्र संघर्ष (शु. पु. जोशी)	" ३००	" १२
६) राजवाडे चरित्र (भा. वा. भट)	" ६३२	" ५०
७) मराठ्यांचा इतिहासाची साधनें (मो. रा. जोशी)	" ६६०	" ५०
८) ऋगवेदातील ज्योतिष मूलक कालनिर्णायक गमके	" १००	" ०७
९) संस्कृत भाषेचा उलगडा (वि. का. कुळकर्णी)	" २१०	" १०
१०) जानकी सैंवर (सं. द. रा. भट)	" २८८	" २०
११) आज्ञापत्र (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित		" २०
१२) अमृतानुभव (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखीत		" ४१
१३) योगचिंतामणी (ऑफसेट प्रिंट)		" ४१
१४) वेडिया नागेश (सं. डॉ. मु. ब. शहा)		" १०
१५) छत्रपतींची १०९ कलमी बखर (सं. डॉ. प्र. न. देशपांडे)		" १०
१६) ज्ञानेश्वरी पदकोश (श्री. शिवाजीराव भावे)		" १००
१७) संशोधक, "सुवर्ण महोत्सवी अंक"	पृष्ठे ३००	" ४०

विक्रीसाठी ठेवलेले इतर ग्रंथ

१) छ. शिवाजी महाराजांची पत्रे (डॉ. प्र. न. देशपांडे) पृष्ठे ३०० रुपये ६५

विशेष सवलत :- वरील १८ पुस्तकांचा संच किंमत रुपये ५४८ चा केवळ रुपयें ४०० ला मिळेल. २ अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमीशन. काही ग्रंथाच्या प्रती अगदीच मर्यादित. टपाल खर्च वेगळा लागेल.

संशोधक त्रैमासिक :- इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेलें दर्जेदार त्रैमासिक गेली ५२ वर्षे प्रकाशित होत आहे वार्षिक वर्गणी फक्त रु. १५/- प्रत्येक अंक किंमत रु. ०५/- ५२ वर्षातील उपलब्ध असलेल्या सर्व अंकाचा संच केवळ रु. ३००/- त उपलब्ध (त्यात सुवर्ण महोत्सवी अंक रु. ४०/-, योगचिंतामणी . ४१/-, आज्ञापत्र रु. २०/- समाविष्ठ.)

चिटणीस,

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

अनेक नाद एक निनाद
आम्ही सारे एक आहोत

वाद्ये अनेक, त्याचे नाद भिन्न भिन्न,
पण जेव्हा त्यांचा सुरेख, लयबद्ध,
एकात्म मेळ जमतो तेव्हा निर्माण होते
सुरेल संगीत, मोहक, आल्हादक,
प्रभावी अन् ओजस्वी

राष्ट्राचेही तसेच आहे, भिन्न जाती,
भिन्न धर्म, भिन्न वंश ह्यांचा एकात्म
मेळ साधला की राष्ट्रही बनते सुंदर
एकसंघ अभेद्य बलवान

राष्ट्रीय एकात्मता राखा देश बलवान बनवा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासनाद्वारा प्रकाशित.